# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.७४७/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. पितांबर गेंदा पाटील ,<br>रा. निकुंभे, ता. जि.धुळे. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी,<br>ता. जि. धुळे. | सहायक गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, धुळे,<br>ता. जि. धुळे. |

**सुनावणी दिनांक — १६/०७/२०२४**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०१/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अद्याप माहिती न मिळाल्याने व अपिलावर सुनावणी न झाल्याने.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : सर्व माहिती विनामुल्य पुरवावी व ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांना आर्थिक दंड करावा.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०२/१२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०२/१२/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ०१/०१/२०१० ते ३१/१२/२०२१

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१. गायरान/गावठान जमीनीवरील झालेल्या अतिक्रमणचा कालावधी, अतिक्रमणाचे प्रयोजन व प्रत्यक्ष वापराची स्थिती (घर, गोठा इ.) व्यक्ती /संस्थेनिहाय अतिक्रमणाचे क्षेत्र इ.ची माहिती.
२. ग्रा.प. मालकीची जागा खाजगी, विश्वस्त संस्था/संघटना किंवा कुटुंबाना मोफत, कराराने किंवा विकत दिली असल्यास ग्रा.पं. चा ठराव, जिल्हा परिषदेच्या मान्यता पत्र इ. ची माहिती.,
३. ग्रा.प. मालकीची शासकीय पडीक जमीन भटक्या विमुक्त जातीतील बेघर, भूमीहीन मजूराना घरकुल, कृषी किंवा इतर प्रयोजनार्थ मोफत, कराराने किंवा विकत देण्यासंदर्भात नियम, कायदे, शासनानिर्णय, पात्रता, कागदपत्रे, प्रक्रीयेसाठी लागणारा खर्च व कालावधीची माहिती,
४. आर्वीतील बेघर, निर्धन, भूमीहीन मजुंराची यादी.
५. आर्वीतील धडरे रस्ता ते राम मंदिर दरम्यान बीएसएनल टॉवर ते सीताराम चौकाच्या पूर्वेकडील गल्ल्यामधील रहिवाशांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याच्या वेळी झालेल्या ग्राम ठरावाची प्रत. व सीटीसर्व्हे उतारा.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०४/०१/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १३/०१/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती न मिळाल्यामुळे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १६/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेला आहे. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात ग्रा. वि. अ. यांनी अपिलार्थीना माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित करुन प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थी यांना दि. २८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये व्यक्तिश: मागणी केली असल्यानुसार सदर माहिती विनामुल्य प्राप्त करुन घेण्यासाठी ग्रा. पं. कार्यालयात येण्याचे कळविले होते, परंतु अपिलार्थी माहिती घेण्यासाठी आले नाही.

६. **निष्कर्ष** —

- अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही सुमारे १२ वर्षाची विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गटविकास अधिकारी, पंचायत समिती धुळे यांनी प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.
- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविलेले आहे.
- अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०२/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ मधील नियम ३(क) नुसार ही माहिती देय नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ७४७/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2295 24 MAR 2025